# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
**प्रथम खबर अहवाल**
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0400 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/09/2026 21:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 08/09/2026
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/09/2026
**Time From (वेळेपासून):** 12:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/09/2026 **Time (वेळ):** 21:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 035
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/09/2026 21:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ग्रामीण तहसिल कार्यालय,धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** यशवंत विश्वनाथ बोरसे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनेश दिलवर दाभाडे | | | 1. ग्राम महसुल अधिकारी, मोहाडी,,धुळे,धुळे शहर,धुळे, महाराष्ट्र,भारत |
| 2 | मृणाल शरद नगराळे | | | 1. ग्राम महसुल अधिकारी, बाळापुर,,धुळे,धुळे शहर,धुळे, महाराष्ट्र,भारत |
| 3 | जयेश कैलास चौधरी | | | 1. दाता सरकार मंगल,कटन मार्केटच्या मागे, धुळे,धुळे शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 12000 | 12,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.07.09.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार आकाश विलास शिंदे यांनी आमचे कक्षात समक्ष हजर राहुन त्यांचेकडे तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. उप विभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र.42, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी श्री. रुतेष राजाराम माळी, सहायक अभियंता व श्रीमती रश्मी राजु सोनार, कनिष्ठ अभियंता यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार आकाश विलास शिंदे व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव आकाश विलास शिंदे, वय 26 वर्ष, व्यवसाय व्यापार, रा. प्लॉट नं. 100, आरती कॉलनी, देवपुर, धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली. त्यानंतर त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार टंकलिखीत करुन घेण्यात आली ती पुढील प्रमाणे ''माझया पत्नीच्या नावे शिवराज इन्फ्रा, या नावाने उद्यम नोंदणी प्रमाणपत्र आहे. माझया मालकीची टाटा कंपनीची हायवा एम.एच.18 बीझेड 9966 व माझया पत्नीच्या नावे एम.एच.18 बीएच 9966 हया क्रमांकाची वाहने असुन सदर वाहनांमधुन मी बांधकाम मटेरियल वाहतुकीचा व्यवसाय करतो.

दि.07.09.2026 रोजी माझया मालकीचे वाहन क्रमांक एम.एच.18 बीएच 9966 वाहन चालक राहुल कुलस्कर हा धुळे शहरातील साक्री रोडवर मोती नाल्याचे पुढे थांबलेला असतांना तेथे तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड असे त्याच्याजवळ आले. तेव्हा त्यांनी वाहन चालकास ''वाहन मालक कुठे आहे'' अशी विचारणा करुन त्यांच्याकडुन माझा मोबाईल नंबर घेवुन तलाठी दाभाडे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9637499553 वरुन माझया मोबाईलवर फोन करुन मला धुळे शहराचे चाळीसगांव चौफुलीवर भेटण्यास बोलविले. त्याप्रमाणे मी चाळीसगांव चौफुली येथे गेलो असता तेथे तलाठी दाभाडे व तलाठी गायकवाड हे उभे होते. तेव्हा मी त्यांची भेट घेतली असता त्यांनी मला ''तुला जर तुझया हायवाने वाहतुक करायची असेल तर तुला आता 20,000/- रुपये द्यावे लागतील, नाही तर तुझया वाहनावर अवैध गौण वाहतुकीचा गुन्हा दाखल करु'' असे सांगितले. तेव्हा मी घाबरुन जावुन त्यांना माझयाजवळ असलेले 8,000/- रुपये तलाठी दाभाडे यांचेकडे दिल्यावर त्यांनी मला बाकी 12,000/- रुपये लागलीच आणुन देण्यास सांगितले. तेव्हा तलाठी गायकवाड यांनी ''आता तु बिनधास्त वाहतुक कर, तुला काही अडचण येणार नाही'' असे सांगितले. तेव्हा मी त्यांना पैसे जमा झाल्यावर फोन करुन भेटण्यास येतो असे सांगितले आहे.

मला तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड यांना त्यांच्या मागणी प्रमाणे उर्वरीत 12,000/- रुपये लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. परंतु मी त्यांना पैसे दिले नाही तर ते माझया वाहनावर विनाकारण कारवाई करतील माझा

त्यांचेशी कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.
मी आज दि.07.09.2026 रोजी त्यांना भेटण्यास जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे.'' अशी तक्रार दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.

दरम्यान तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवर जयेश चौधरी या नावाने फोन आला असल्याचे सांगितले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन जयेश चौधरी यांना फोन केला असता खाजगी इसम जयेश चौधरी यांनी तलाठी आप्पांनी फोन करायला सांगितला होता असे सांगुन तक्रारदार यांना संध्याकाळी फोन करुन भेटण्यास सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी दिनेश दाभाडे यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन तुम्ही कुणाला फोन करायला लावला होता का? असे विचारले, तेव्हा तलाठी दाभाडे यांनी त्यास होकार दिला, तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना कोठे आहेत बाबत विचारणा केली असता त्यांनी ऑफिसला आहे असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना मी भेटायला येतो असे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन तलाठी दिनेश दाभाडे यांची धुळे तहसिल कार्यालयात भेट घेण्यासाठीं तक्रारदार यांची दुचाकी क्रमांक एम.एच.18 सीजे 9500 ने तक्रारदार आकाश शिंदे व पंच नं. 01 रुतेष माळी यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच माळी असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 माळी यांना विचारणा केली असता त्यांनी ते व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने धुळे तहसिल कार्यालयात गेले. तेथे तलाठी दाभाडे मिळुन न आल्याने तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवरुन तलाठी दाभाडे यांना स्पिकर सुरु करुन फोन करुन कार्यालयात आलो आहे असे सांगितले. तेव्हा तलाठी दाभाडे यांनी तक्रारदार यांना ते बाहेर असुन जयेश चौधरी (बंटी) तुम्हाला फोन करतील, त्याला लगेच भेटुन घे, असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी दाभाडे यांना फोन केला असता त्यांनी ते बाहेर आहेत, बंटी तुम्हाला फोन करेल असे सांगितले. त्यानंतर काही वेळात जयेश चौधरी (बंटी) यांचा तक्रारदार यांच्या मोबाईलवर फोन आला, तो त्यांनी मोबाईलचा स्पिकर सुरु करुन उचलला, तेव्हा तक्रारदार यांनी तलाठी आप्पांना भेटण्यास आलो असल्याचे सांगितले, तेव्हा जयेश चौधरी यांनी तक्रारदार यांना महाकाली मंदिराजवळ या असे सांगितले. तेथे आपण बोलु असे सांगितले. त्यानंतर ते व तक्रारदार ला.प्र.वि. धुळे कार्यालयात परत आले अशी हकीगत कथन केली.
त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हास जयेश चौधरी (बंटी) याचा त्यांच्या मोबाईलवर फोन येत असल्याचे सांगितले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन त्यांच्या फोन उचलला, तेव्हा चौधरी (बंटी) यांनी तक्रारदार यांना ते महाकाली मंदिराजवळ आले असल्याचे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना तेथे येतो असे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार व पंचांना पुन्हा सविस्तर सुचना देवुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना व पंच माळी यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन जयेश चौधरी (बंटी) यांची भेट घेण्यासाठी धुळे शहरातील महाकाली मंदिराजवळ तक्रारदार यांची दुचाकी क्रमांक एम.एच.18 सीजे 9500 ने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच माळी असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 माळी यांना विचारणा केली असता त्यांनी ''ते व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने महाकाली मंदिराजवळ गेलो तेथे तक्रारदार यांनी चौधरी (बंटी) यांना फोन करुन कुठे आहेत बाबत विचारणा केली. तेव्हा त्यांनी मंदिराजवळ असलेल्या मंडपाजवळ येण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते चौधरी (बंटी) जवळ गेले, तेथे तक्रारदार व चौधरी यांच्यात चर्चा झाली. चर्चे दरम्यान चौधरी (बंटी) यांनी तक्रारदार यांना तहसिलदार मॅडमशी डायरेक्ट लाईन लावुन घ्यायची, म्हणजे रात्री बेरात्री कोणी थांबवलं तर त्यांच्याशी फोन जोडता येतो असे सांगितले. व त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी आप्पांनी 30,000/- रुपये सांगितले होते, त्यांना 20,000/- रुपयात फायनल केलं होतं असे सांगितल्यावर चौधरी (बंटी) यांनी आप्पांसोबत 2/3 लोकं राहतील असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी आप्पा आता किती बोलले, अशी त्यांना विचारणा केली. तेव्हा चौधरी (बंटी यांनी त्यांच्या मोबाईलवरुन तलाठी दाभाडे यांना फोन करुन त्यांना बारा हजार घ्यायचे का? अशी विचारणा केली. त्यानंतर तक्रारदार यांनी चौधरी (बंटी) यांना किती अशी विचारणा केली, तेव्हा त्यांनी पहिले आठ दिले होते ना, आता बाकी द्या असे सांगितले. अशी हकिगत कथन केली.

सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये खाजगी इसम चौधरी (बंटी) यांनी तलाठी दाभाडे यांच्या सांगण्याप्रमाणे तक्रारदार यांच्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची खात्री झाली.

त्यानंतर आज दि.08.09.2026 रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आला. तेव्हा तक्रारदार यांनी 500/- रुपये दराच्या 24 नोटा असे 12,000/- रुपये हजर केले. त्यानंतर सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवर चौधरी (बंटी) यांचा फोन येत असल्याचे सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन चौधरी (बंटी) यांचा फोन उचलला, तेव्हा चौधरी (बंटी) यांनी तक्रारदार यांना अपर तहसिल कार्यालयाजवळ येण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 माळी अशांना तक्रारदार यांच्या चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. 18 बीएक्स 9500 ने धुळे अपर तहसिल कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 श्रीमती सोनार, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. रामदास बारेला, असे खाजगी कार क्रमांक एम.एच.18 बीसी 9728 ने तसेच पोलीस उप अधीक्षक सचिन साळुंखे व पोहेकॉ. प्रविण मोरे हे शासकिय वाहन क्रमांक एम.एच.18 बीएक्स 0221 ने वाहन चालक पोहेकॉ. सुधीर मोरे यांचेसह रवाना होवुन धुळे शहरातील अपर तहसिल कार्यालयाचे आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोरील रस्त्यावरुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पंच नं. 01 माळी यांनी सांगितल्याप्रमाणे जयेश चौधरी (बंटी) यांनी तक्रारदार यांच्याकडुन 12,000/- रुपये लाच स्विकारुन त्यांच्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगुन त्यादरम्यान चौधरी (बंटी) यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी नगराळे यांना त्यांच्या मोबाईलवर फोन लावुन तक्रारदार यांना त्यांचेशी बोलण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी 12,000/- रुपये चौधरी यांच्याकडे दिल्याचे सांगुन काल 8,000/- रुपये दाभाडे आप्पांकडे दिले असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन चौधरी (बंटी) यांच्या समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवुन घेतली असल्याचे सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोहेकॉ. प्रविण मोरे व पोकॉ/रामदास बारेला यांनी जयेश चौधरी (बंटी) यांना त्यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकावुन ठेवले. त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 श्रीमती सोनार यांनी चौधरी (बंटी) यांच्या शर्टाच्या खिशातील लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर अटकावलेल्या अवस्थेत चौधरी (बंटी) यांना खाजगी वाहनात बसविले. तेव्हा त्यांनी आम्हास सांगितले की, सदर लाचेची रक्कम त्यांनी तलाठी दाभाडे व तलाठी नगराळे यांचे सांगणेवरुन स्विकारली असुन याबाबत त्यांना फोन करुन त्यांची भेट घेवुन सदर लाचेची रक्कम त्यांच्याकडे देवुन आपली खात्री करुन देतो असे सांगितले.

त्यानंतर आम्ही चौधरी (बंटी) यांना त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी दाभाडे यांच्या मोबाईलवर फोन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे चौधरी (बंटी) यांनी तलाठी दाभाडे यांना फ मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.07.09.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार आकाश विलास शिंदे यांनी आमचे कक्षात समक्ष हजर राहुन त्यांचेकडे तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. उप विभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र.42, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी श्री. रुतेष राजाराम माळी, सहायक अभियंता व श्रीमती रश्मी राजु सोनार, कनिष्ठ अभियंता यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार आकाश विलास शिंदे व सापळा पथकाची ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव आकाश विलास शिंदे, वय 26 वर्ष, व्यवसाय व्यापार, रा. प्लॉट नं. 100, आरती कॉलनी, देवपुर, धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली. त्यानंतर त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार टंकलिखीत करुन घेण्यात आली ती पुढील प्रमाणे ''माझया पत्नीच्या नावे शिवराज इन्फ्रा, या नावाने उद्यम नोंदणी प्रमाणपत्र आहे. माझया मालकीची टाटा कंपनीची हायवा एम.एच.18 बीझेड 9966 व माझया पत्नीच्या नावे एम.एच.18 बीएच 9966 हया क्रमांकाची वाहने असुन सदर वाहनांमधुन मी बांधकाम मटेरियल वाहतुकीचा व्यवसाय करतो.

दि.07.09.2026 रोजी माझया मालकीचे वाहन क्रमांक एम.एच.18 बीएच 9966 वाहन चालक राहुल कुलस्कर हा धुळे शहरातील साक्री रोडवर मोती नाल्याचे पुढे थांबलेला असतांना तेथे तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड असे त्याच्याजवळ आले. तेव्हा त्यांनी वाहन चालकास ''वाहन मालक कुठे आहे'' अशी विचारणा करुन त्यांच्याकडुन माझा मोबाईल नंबर घेवुन तलाठी दाभाडे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9637499553 वरुन

माझया मोबाईलवर फोन करुन मला धुळे शहराचे चाळीसगांव चौफुलीवर भेटण्यास बोलविले. त्याप्रमाणे मी चाळीसगांव चौफुली येथे गेलो असता तेथे तलाठी दाभाडे व तलाठी गायकवाड हे उभे होते. तेव्हा मी त्यांची भेट घेतली असता त्यांनी मला "तुला जर तुझया हायवाने वाहतुक करायची असेल तर तुला आता 20,000/- रुपये द्यावे लागतील, नाही तर तुझया वाहनावर अवैध गौण वाहतुकीचा गुन्हा दाखल करु" असे सांगितले. तेव्हा मी घाबरुन जावुन त्यांना माझयाजवळ असलेले 8,000/- रुपये तलाठी दाभाडे यांचेकडे दिल्यावर त्यांनी मला बाकी 12,000/- रुपये लागलीच आणुन देण्यास सांगितले. तेव्हा तलाठी गायकवाड यांनी "आता तु बिनधास्त वाहतुक कर, तुला काही अडचण येणार नाही" असे सांगितले. तेव्हा मी त्यांना पैसे जमा झाल्यावर फोन करुन भेटण्यास येतो असे सांगितले आहे.

मला तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड यांना त्यांच्या मागणी प्रमाणे उर्वरीत 12,000/- रुपये लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. परंतु मी त्यांना पैसे दिले नाही तर ते माझया वाहनावर विनाकारण कारवाई करतील माझा त्यांचेशी कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.

मी आज दि.07.09.2026 रोजी त्यांना भेटण्यास जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे." अशी तक्रार दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.

दरम्यान तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवर जयेश चौधरी या नावाने फोन आला असल्याचे सांगितले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन जयेश चौधरी यांना फोन केला असता खाजगी इसम जयेश चौधरी यांनी तलाठी आप्पांनी फोन करायला सांगितला होता असे सांगुन तक्रारदार यांना संध्याकाळी फोन करुन भेटण्यास सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी दिनेश दाभाडे यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन तुम्ही कुणाला फोन करायला लावला होता का? असे विचारले, तेव्हा तलाठी दाभाडे यांनी त्यास होकार दिला, तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना कोठे आहेत बाबत विचारणा केली असता त्यांनी ऑफिसला आहे असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना मी भेटायला येतो असे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन तलाठी दिनेश दाभाडे यांची धुळे तहसिल कार्यालयात भेट घेण्यासाठी तक्रारदार यांची दुचाकी क्रमांक एम.एच.18 सीजे 9500 ने तक्रारदार आकाश शिंदे व पंच नं. 01 रुतेष माळी यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच माळी असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 माळी यांना विचारणा केली असता त्यांनी ते व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने धुळे तहसिल कार्यालयात गेले. तेथे तलाठी दाभाडे मिळुन न आल्याने तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवरुन तलाठी दाभाडे यांना स्पिकर सुरु करुन फोन करुन कार्यालयात आलो आहे असे सांगितले. तेव्हा तलाठी दाभाडे यांनी तक्रारदार यांना ते बाहेर असुन जयेश चौधरी (बंटी) तुम्हाला फोन करतील, त्याला लगेच भेटुन घे, असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी दाभाडे यांना फोन केला असता त्यांनी ते बाहेर आहेत, बंटी तुम्हाला फोन करेल असे सांगितले. त्यानंतर काही वेळात जयेश चौधरी (बंटी) यांचा तक्रारदार यांच्या मोबाईलवर फोन आला, तो त्यांनी मोबाईलचा स्पिकर सुरु करून उचलला, तेव्हा तक्रारदार यांनी तलाठी आप्पांना भेटण्यास आलो असल्याचे सांगितले, तेव्हा जयेश चौधरी यांनी तक्रारदार यांना महाकाली मंदिराजवळ या असे सांगितले. तेथे आपण बोलु असे सांगितले. त्यानंतर ते व तक्रारदार ला.प्र.वि. धुळे कार्यालयात परत आले अशी हकीगत कथन केली.

त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हास जयेश चौधरी (बंटी) याचा त्यांच्या मोबाईलवर फोन येत असल्याचे सांगितले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन त्यांच्या फोन उचलला, तेव्हा चौधरी (बंटी) यांनी तक्रारदार यांना ते महाकाली मंदिराजवळ आले असल्याचे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना तेथे येतो असे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार व पंचांना पुन्हा सविस्तर सुचना देवुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना व पंच माळी यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन जयेश चौधरी (बंटी) यांची भेट घेण्यासाठी धुळे शहरातील महाकाली मंदिराजवळ तक्रारदार यांची दुचाकी क्रमांक एम.एच.18 सीजे 9500 ने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच माळी असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 माळी यांना विचारणा केली असता त्यांनी "ते व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने महाकाली मंदिराजवळ गेलो तेथे तक्रारदार यांनी चौधरी (बंटी) यांना फोन करुन कुठे आहेत बाबत विचारणा केली. तेव्हा त्यांनी मंदिराजवळ असलेल्या मंडपाजवळ येण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते चौधरी (बंटी) जवळ गेले, तेथे तक्रारदार व चौधरी यांच्यात

चर्चा झाली. चर्चे दरम्यान चौधरी (बंटी) यांनी तक्रारदार यांना तहसिलदार मॅडमशी डायरेक्ट लाईन लावुन घ्यायची, म्हणजे रात्री बेरात्री कोणी थांबवलं तर त्यांच्याशी फोन जोडता येतो असे सांगितले. व त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी आप्पांनी 30,000/- रुपये सांगितले होते, त्यांना 20,000/- रुपयात फायनल केलं होतं असे सांगितल्यावर चौधरी (बंटी) यांनी आप्पांसोबत 2/3 लोकं राहतील असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी आप्पा आता किती बोलले, अशी त्यांना विचारणा केली. तेव्हा चौधरी (बंटी यांनी त्यांच्या मोबाईलवरुन तलाठी दाभाडे यांना फोन करुन त्यांना बारा हजार घ्यायचे का? अशी विचारणा केली. त्यानंतर तक्रारदार यांनी चौधरी (बंटी) यांना किती अशी विचारणा केली, तेव्हा त्यांनी पहिले आठ दिले होते ना, आता बाकी द्या असे सांगितले. अशी हकिगत कथन केली.

सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये खाजगी इसम चौधरी (बंटी) यांनी तलाठी दाभाडे यांच्या सांगण्याप्रमाणे तक्रारदार यांच्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची खात्री झाली. त्यानंतर आज दि.08.09.2026 रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आला. तेव्हा तक्रारदार यांनी 500/- रुपये दराच्या 24 नोटा असे 12,000/- रुपये हजर केले. त्यानंतर सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवर चौधरी (बंटी) यांचा फोन येत असल्याचे सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन चौधरी (बंटी) यांचा फोन उचलला, तेव्हा चौधरी (बंटी) यांनी तक्रारदार यांना अपर तहसिल कार्यालयाजवळ येण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 माळी अशांना तक्रारदार यांच्या चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. 18 बीएक्स 9500 ने धुळे अपर तहसिल कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 श्रीमती सोनार, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. रामदास बारेला, असे खाजगी कार क्रमांक एम.एच.18 बीसी 9728 ने तसेच पोलीस उप अधीक्षक सचिन साळुंखे व पोहेकॉ. प्रविण मोरे हे शासकिय वाहन क्रमांक एम.एच.18 बीएक्स 0221 ने वाहन चालक पोहेकॉ. सुधीर मोरे यांचेसह रवाना होवुन धुळे शहरातील अपर तहसिल कार्यालयाचे आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोरील रस्त्यावरुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पंच नं. 01 माळी यांनी सांगितल्याप्रमाणे जयेश चौधरी (बंटी) यांनी तक्रारदार यांच्याकडुन 12,000/- रुपये लाच स्विकारुन त्यांच्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगुन त्यादरम्यान चौधरी (बंटी) यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी नगराळे यांना त्यांच्या मोबाईलवर फोन लावुन तक्रारदार यांना त्यांचेशी बोलण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी 12,000/- रुपये चौधरी यांच्याकडे दिल्याचे सांगुन काल 8,000/- रुपये दाभाडे आप्पांकडे दिले असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन चौधरी (बंटी) यांच्या समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांच्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवुन घेतली असल्याचे सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोहेकॉ. प्रविण मोरे व पोकॉ/रामदास बारेला यांनी जयेश चौधरी (बंटी) यांना त्यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकावुन ठेवले. त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 श्रीमती सोनार यांनी चौधरी (बंटी) यांच्या शर्टच्या खिशातील लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर अटकावलेल्या अवस्थेत चौधरी (बंटी) यांना खाजगी वाहनात बसविले. तेव्हा त्यांनी आम्हास सांगितले की, सदर लाचेची रक्कम त्यांनी तलाठी दाभाडे व तलाठी नगराळे यांचे सांगणेवरुन स्विकारली असुन याबाबत त्यांना फोन करुन त्यांची भेट घेवुन सदर लाचेची रक्कम त्यांच्याकडे देवुन आपली खात्री करुन देतो असे सांगितले.

त्यानंतर आम्ही चौधरी (बंटी) यांना त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी दाभाडे यांच्या मोबाईलवर फोन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे चौधरी (बंटी) यांनी तलाठी दाभाडे यांना फोन करुन तक्रारदार यांच्याकडुन पैसे ताब्यात घेतल्याचे सांगितले. तेव्हा दाभाडे यांनी "ओके ओके ठिक आहे, मृणाल बोलला मला" असे सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन चौधरी (बंटी) यांना त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन तलाठी दाभाडे यांच्या मोबाईलवर फोन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे चौधरी (बंटी) यांनी तलाठी दाभाडे यांना फोन करुन ते कोठे आहेत बाबत विचारणा केली असता त्यांनी ग्रामीण तहसिल कार्यालयात असल्याचे सांगितले. तेव्हा चौधरी यांनी (बंटी) त्यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम ही ग्रामीण तहसिल कार्यालय येथे जावुन तलाठी दाभाडे यांना देतो असे सांगितले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 श्रीमती सोनार यांनी चौधरी यांचेकडुन ताब्यात घेतलेली लाचेची रक्कम चौधरी (बंटी) यांच्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही, पंच नं. 02, अटकावलेल्या अवस्थेत चौधरी (बंटी), पोहेकॉ. प्रविण मोरे, पोकॉ. रामदास बारेला असे खाजगी कारने व पोलीस उप अधीक्षक सचिन साळुंखे, पोकॉ. मकरंद पाटील असे शासकिय वाहनाने चालक पोहेकॉ. सुधीर मोरे यांचेसह तसेच तक्रारदार व पंच

नं. 01 माळी असे तक्रारदार यांच्या कारने रवाना होवुन ग्रामीण तहसिल कार्यालयाचे बाहेर थांबलो. तेथे चौधरी (बंटी) यांचेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच नं. 01 माळी यांचेसह ग्रामीण तहसिल कार्यालयात तलाठी दाभाडे यांची भेट घेण्यास पायी रवाना केले. त्याचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 व सापळा पथक असे पायी रवाना होवुन ग्रामीण तहसिल कार्यालयाजवळ सापळा लावुन आम्ही चौधरी (बंटी) यांचेवर लक्ष ठेवुन होतो. तेव्हा काही वेळात तलाठी दाभाडे हे तहसिल कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ येवुन चौधरी (बंटी) यांना भेटले. तेव्हा चौधरी (बंटी) यांनी त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन तलाठी दाभाडे यांच्याकडे दिली, तेव्हा त्यांनी सदर लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवुन घेवुन परत तहसिल कार्यालयात जात असतांना पोकॉ. रामदास बारेला यांनी तलाठी दाभाडे यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन अटकावुन ठेवले. तसेच पोहेकॉ. प्रविण मोरे यांनी चौधरी (बंटी) यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन ताब्यात घेतले. त्यानंतर ला.प्र.वि, धुळे कार्यालयात येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
अशा प्रकारे दिनेश दिलवर दाभाडे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), मोहाडी, अति. कार्यभार फागणे व मृणाल शरद नगराळे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), बाळापुर यांनी तक्रारदार आकाश विलास शिंदे यांना त्यांच्या हायवा वाहनाने बांधकाम मटेरीयल वाहतुक करु देण्यासाठी त्यांच्याकडे दि.07.09.2026 रोजी 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 8,000/- रुपये लाचेची रक्कम दि.07.09.2026 रोजी स्विकारुन दि. 07.09.2026 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान जयेश कैलास चौधरी उर्फ बंटी, खाजगी इसम यांचे मार्फतीने उर्वरीत 12,000/- रुपये लाचेची मागणी करुन दि.08.09.2026 रोजी दुपारी 12:57 वाजता धुळे ग्रामीण तहसिल कार्यालयाचे प्रवेशद्वारासमोर सदर लाचेची रक्कम जयेश कैलास चौधरी उर्फ बंटी यांचे हस्ते स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरुपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 व 7-अ प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

hemantkumar sahebrao bhamare (I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): hemantkumar sahek
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)